# राष्ट्रीय आरोग्य अभियान
# राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम,
# जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत, जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर यांचे मार्फत एकत्रित मानधनावर खाली दिलेल्या तक्यातील **वैद्यकिय अधिकारी, वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक, वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक व टीबी हेल्थ व्हिजीटर** ही पदे कंत्राटी पध्दतीने भरणेत येणार असुन **"गुणानुक्रमानुसार"** अधिकत्तम गुण मिळालेल्या उमेदवारांची पद भरती करण्यात येणार आहे.

## कंत्राटी पदभरती बाबतचा तपशिल व जाहिरात खालील प्रमाणे.

**योजनेचे नाव** - राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम (NTEP)
**संस्थेचे नाव** - जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर

| अ. क्र. | एकूण पद संख्या | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता | प्रतिमाह एकत्रित मानधन | प्राधान्य |
|---|---|---|---|---|---|
| | **पदाचे नाव - वैद्यकिय अधिकारी, (NTEP – Medical College)** | | | | |
| १ | १ | खुला-१ | MBBS or equivalent degree from institution recognized by medical council of India, must have completed compulsory rotatory internship | Rs.60000/- | 1) Diploma / MD Public Health / PSM . Community Medicine / CHA / Tuberculosis & Chest Diseases<br>2) One Year Experience in NTEP<br>3) Basic Knowledge of Computers |
| | **पदाचे नाव - वरिष्ठ क्षयरोग उपचार पर्यवेक्षक (STS)** | | | | |
| २ | २ | अ.ज.-१<br>इ.मा.व.-१ | 1) Bachelor's Degree OR Recognized sanitary inspector's course<br>2) Certificate course in computer operation (minimum 2 months)<br>3) Permanent two wheeler driving license & should be able to drive two wheeler | Rs.20000/- | 1)Tuberculosis health visitor's recognized course Govt. recognized degree/ diploma in social work or Medical Social work<br>2) Successful completion of basic training course (Govt.recognized) for Multi-purpose health workers |
| | **पदाचे नाव - वरिष्ठ क्षयरोग प्रयोगशाळा पर्यवेक्षक, (STLS)** | | | | |
| ३ | १ | अ.ज.-१ | 1) Graduate or Diploma in Medical Laboratory Technology or equivalent from a Govt. recognized institution<br>2) Permanent two-wheeler driving license & should be able to drive two-wheeler<br>3) Certificate course in computer operation (minimum 2 months) | Rs.20000/- | Minimum one year of experience in NTEP |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | **पदाचे नाव – टीबी हेल्थ व्हिजीटर (TBHV)** | | | | |
| | १ | अ.ज.-१ | 1. Graduate in Science OR<br>2. Intermediate (10 + 2) in Science and experience of working as MPW/LHV/ANM/ Health worker/ Certificate OR higher course in Health Education /Counselling OR<br>3) Tuberculosis health visitor's recognized course<br>4) Certificate course in computer operations (minimum 2 months) | Rs.15500/- | 1) Training course for MPW or recognized sanitary inspector's course |
| टिप – खुला प्रवर्ग – ३८ वर्षे राखीव प्रवर्ग – ४३ वर्षे(राआअ अभियानांतर्गत कार्यरत उमेदवारास सेवाप्रवेश मर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल राहील) | | | | | |

***सुचना –***

१) सदरची पदे राज्य शासनाची नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची आहेत. सदर पदांवर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाही.

२) पदांची संख्या गरजेप्रमाणे बदलणेची शक्यता आहे. तसेच आवश्यक पात्रता असलेले उमेदवार न मिळाल्यास त्या पदांकरीता असलेली पात्रता अनुभव व अर्हता नुसार शिथिल करणेचे अधिकारी निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत.

३) पदांसाठी वेतन हे एकत्रित मानधन आहे.

४) नियम व अटींच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात येतील. उमेदवारांची नियुक्ती ही गुणनिहाय करणेत येईल. उच्च शैक्षणिक अर्हता धारकास व शासकिय अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.

५) विहीत नमुन्यात अर्ज साक्षांकित प्रतीसह **जिल्हा क्षयरोग केंद्र, बिल्डींग नं.१४ "कृष्णा" इमारत, सीपीआर हॉस्पीटल आवार, कोल्हापूर** येथे दि.१७/०८/२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत सादर करावेत. त्यानंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

६) अ.क्र.२ ते अ.क्र.४ साठी शासकिय मान्यता प्राप्त संगणक कोर्स (MS-CIT/ CCC) असणे आवश्यक आहे.

७) अ.क्र.२ ते ४ चे पद भरती करतेवेळी अनुक्रमे अनुसुचित जमाती व इ.मा.व. या प्रवर्गातील अर्जदार यांचे अर्ज प्राप्त न झालेस, सदरचे पद खुला प्रवर्गातुन भरणेत येईल.

८) निवड केलेल्या उमेदवारांना सुरुवातीला ११ महिन्यांची नेमणुक दिली जाईल. काम असमाधानकारक असलेस पुर्ननियुक्ती दिली जाणार नाही. तसेच सदर जागेवर कोणत्याही स्वरुपाचा दावा दाखल करता येणार नाही. शासकिय नियमित सेवेत सामावुन घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणासंबधी दावा करणेचे अधिकार राहणार नाहीत.

९) अर्जदाराने ए-४ साईजच्या को-या कागदावर विहित नमुन्यामध्ये अर्ज करावयाचा असुन त्यामध्ये खालील बाबी अंर्तभुत असाव्यात. सोबत अर्जाचा नमुना प्रसिध्द केला आहे.

**अ**) उमेदवाराची सर्वसाधारण माहिती – १) अर्ज केलेल्या पदाचे नाव २) ठळक अक्षरात स्वतःचे नाव ३) अर्जदाराचा पत्ता व दुरध्वनी व मोबाईल क्रमांक ४) ई – मेल आयडी ५) जन्मतारीख ६) शैक्षणिक अर्हतेचा संपुर्ण तपशिल – अभ्यासक्रमाचे नाव, उत्तीर्ण झालेचे वर्षे, गुणांचा तपशिल व टक्केवारी ७) कामाचा अनुभव – काम केलेली संस्था, एकुण कालावधी, संबधित संस्थेत कोणत्या पदावर काम केले आहे.

**ब**) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती – १) शैक्षकिण अर्हतेचे प्रमाणपत्र २)शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ३) अनुभवाचे प्रमाणपत्र ४) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो ५)एक कोरा लिफाफा ज्यावर रु.५/- चे टपाल तिकीट लावून स्वतःचा नाव व पत्ता प्रति याठिकाणी लिहून अर्जासोबत जोडावा.६)अर्जासोबत साक्षांकित Caste Certificate/Cast Validity जमा करणे आवश्यक आहे. ७) गुणपत्रक तसेच पदवी/पदविकेचे प्रमाणपत्र सांक्षाकित करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

क) अर्जदाराने खुल्या प्रवर्गासाठी रु.१५०/- व राखीव प्रवर्गासाठी रु.१००/- इतके शुल्क ***District Integrated Health and Family Welfare Society Kolhapur RNTCP*** यांचे नावे डिमांड ड्राफटचे स्वरुपात देण्यात यावे.

१०) अर्जदार हा संबधित पदांसाठी शारिरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

११) अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकाराचा दबाव आणल्यास त्याच निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्याच्या सोईनुसार ठिकाण बदलून मागता येणार नाही.

१२) कोणतीही पुर्वसुचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलणेचे किंवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत.

१३) कोवीड १९ चा प्रादूर्भाव लक्षात घेता उमेद्वार यांची गुणाणुक्रमानुसार निवड करण्यात येईल. सदर निवड यादी www.zpkolhapur.gov.in या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देणेत येईल. याची नोंद उमेद्वार यांनी घ्यावी.

१४) उमेदवार यांनी आपला भ्रमणध्वनी क्रमांक चालू सुस्थीत असणारा दयावा. वेळोवेळी पदभरती बाबतची माहीती भ्रमणध्वनीवर कळविण्यात येईल.

**सही/-**

सदस्य सचिव
सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण
सोसायटी, को.
तथा
जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर

**सही/-**

अध्यक्ष
सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण सोसायटी,
को.
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर

# अर्जाचा नमुना

..............या पदासाठी अर्ज

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजीकचा साक्षांकित फोटो |
|---|

(फोटोवर उमेदवारांची स्वाक्षरी)

प्रति,

मा.अध्यक्ष
राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण सोसायटी, को.
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर.

**संपूर्ण नाव** **मराठी** **इंग्रजी (कॅपीटल लेटर)**

१) आडनाव .................. ..............................

२) स्वतः चे नाव .................. ..............................

३) वडिलांचे /पतीचे नाव .................. ..............................

४) आईचे नाव .................. ..............................

पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिनकोड सहीत

....................................................................
....................................................................
....................................................................

दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक ..............................................

५) जन्मतारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

६)आज अखेरचे वय
(जाहिरात दिनांकापर्यंत)

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

७) खाली नमुद केलेल्या प्रवर्गासाठी लागु असलेल्या चौकटीमध्ये (√) अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज | वि.जा.अ | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | उर्त्तीण केलेली परीक्षा | विदयापीठ/ मंडळाचे नाव | परीक्षा उत्तीर्ण होण्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

९) अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | |
| | | | |
| | | | |

१०)आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे काय ? असल्यास थोडक्यात तपशिल दयावा. होय/ नाही -

११) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१)......................२)..........................३).........................४).................

१२) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय/ नाही ________________

मी असे प्रमाणित करतो /करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही

**ठिकाण :**
**दिनांक :**

(अर्जदाराचे नाव : )